महाराष्ट्र शासन
वन विभाग
# मुख्य वनसंरक्षक, चंद्रपुर वनवृत्त, चंद्रपुर यांचे कार्यालय
सिव्हील लाईन, नागपुर रोड, चंद्रपुर- 442401
दुरध्वनी क्र. 07172-256279, 252232
Email id- ccfchandrapur@gmail.com, ccftchandrapur@mahaforest.gov.in

क्रमांक : कक्ष-3(1)/जमिन/प्र.क्र.572/2023-24/ 63 दिनांक :- 18-8-2023

प्रति,

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य, नागपूर**

विषय :- वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत मौजा चक फुटाणा ते चक नवेगाव रस्ता बांधकामाकरीता 2.3427 हे. आर. वनजमीन वळतीकरण करणे बाबतचा प्रस्ताव.

संदर्भ :-
1. शासन पत्र क्र. एफएलडी-3623/प्र.क्र.29/F-10, दिनांक 10.02.2023.
2. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-3(1)/जमिन/प्र.क्र.572/2023-24/1442, दिनांक 28.03.2023.
3. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-17/ नोडल/चंद्रपूर/आयडी-14209/17/23-24, दिनांक 03.04.2023.
4. उपवनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांचे पत्र क्र. कक्ष/जमीन/2023-24/65, दि. 17.04.2023.

महाराष्ट्र शासनाचे संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये विषयांकीत प्रस्तावामध्ये 1 ते 6 त्रुटया उपस्थित केलेल्या होत्या. त्यानुषंगाने या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये त्रुटी पुर्तता अहवाल सादर करण्यात आलेला होता. परंतु आपले संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये पुनश्च अतिरिक्त विचारणा करण्यात आलेल्या माहितीबाबत उपवनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांचे कडून त्रुटीची पुर्तता करण्याकरीता कळविण्यात आलेले होते. त्यानुषंगाने त्यांचे संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वये त्यांच्याशी संबंधीत असलेल्या मुददयांची पुर्तता व प्रकल्प यंत्रणेशी संबंधीत असलेल्या मुददयांची पुर्तता करून आणि योग्य असल्याची खातरजमा केल्यानंतर एकत्रिक अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपवनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांनी सादर केलेल्या अहवालाचे संस्करण करण्यात आले व ते योग्य असल्याने हे कार्यालयसुध्दा सहमती दर्शवून खालीलप्रमाणे अहवाल सादर करीत आहे.

| अ.क्र. | घेतलेले आक्षेप | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| 1 | सदर प्रस्तावास पर्यायी वनीकरण योजना लागू होत नाही बाबत सोबत जोडण्यात आलेल्या केंद्र शासनाचे दिनांक 13.05.2023, दिनांक 16.06.2011, दिनांक 17.05.2013 चा अभ्यास करण्यात आला आणि दिनांक 28.03.2019 चे पत्रान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या हँड बुक नुसार डाव्या विचारसरणी ने प्रभावित | केंद्र शासनाचे पत्रान्वये (Left Wing Extremist) च्या क्षेत्रामध्ये वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत 5 हेक्टरपेक्षा कमी असलेल्या प्रकल्प बाधीत क्षेत्राकरीता C.A. करीता सुट दिलेली होती. परंतु दिलेली मुदत संपुष्टात आल्याने सदर प्रकल्पाकरीता C.A. घेणे अनिवार्य |

<table>
<tr><td></td><td>क्षेत्रातील (Left Wing Extremist) तेरा (13) प्रकल्पांची मुदत दिनांक 31.12.2020 पर्यंतच होती. सदरची मुदत वाढविण्यात आलेली नाही. याबाबत केंद्र शासनाचे नागपुर स्थित कार्यालयाशी संपर्क करून खात्री करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर प्रस्तावास पर्यायी वनीकरणाची योजना सादर करणे बंधनकारक आहे.</td><td>असल्याने उपवनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांनी पर्यायी वनीकरणाची योजना, नकाशा, KML File CD मध्ये दिलेली आहे. त्याचप्रमाणे ऑनलाईन पार्ट-II मध्ये सुध्दा दुरूस्ती करण्यात आलेली आहे आणि हार्ड कॉपी पत्रासोबत सहपत्रीत करण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>2</td><td>पर्यायी वनीकरणाचे क्षेत्राची निवड करणे, प्रकल्प यंत्रणेचे पर्यायी वनीकरणा संबंधी रक्कम भरण्यास तयार असल्याचे हमीपत्र घेणे, पर्यायी वनीकरण क्षेत्राची KML file संपुर्ण माहितीसह आणि पर्यायी वनीकरणाची 10 वर्षाच्या योजनेसह परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास तीन प्रतीत सादर करावा.</td><td>उपवनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांनी पर्यायी वनीकरणाचे क्षेत्राची निवड खालीलप्रमाणे केलेली आहे.<br><table><tr><th>परिक्षेत्र</th><th>उपक्षेत्र</th><th>नियतक्षेत्र</th><th>गाव</th><th>क.न.</th><th>क्षेत्र (हे.)</th></tr><tr><td>पोंभुर्णा</td><td>घोसरी</td><td>नवेगाव भुजला</td><td>नवेगाव भुजला</td><td>586</td><td>5.00</td></tr></table><br>1) प्रकल्प यंत्रणेनी पर्यायी वनीकरणासंबंधी रक्कम भरण्यास तयार असल्याचे हमीपत्र (Undertaking) दिलेले आहे.<br>2) पर्यायी वनीकरण क्षेत्राच्या KML File मध्ये संपुर्ण माहिती दिलेली आहे व पर्यायी वनीकरणाची 10 वर्षाची योजना पत्रासोबत जोडण्यात येत आहे.<br>3) पर्यायी वनीकरणाकरीता उपलब्ध क्षेत्राबाबत उपवनसंरक्षक, मध्य चांदा यांनी Suitability Certificate दिलेले आहे व ते पत्रासोबत जोडण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>3</td><td>तसेच प्रस्ताव सादर करतांना जे वनक्षेत्र वळती करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे त्याचा तपशिलानुसार KML file ज्यामध्ये कम्पार्टमेंट बाउंड्री, गट/ सर्व्हे बाउंड्री, गावाचे नाव, रेंज, राउंड, बिट, क्षेत्राची लांबी रूंदी, क्षेत्रफळ चौ. मीटर आणि हेक्टर मध्ये या प्रमाणे सादर करावी.</td><td>सदरहु प्रकल्पाच्या वळती करण्यात येणा-या क्षेत्राची माहिती KML File मध्ये प्रकल्प यंत्रणेनी पुर्तता करून CD मध्ये KML File दिलेली आहे व पत्रासोबत सादर करण्यात येत आहे.</td></tr>
</table>

सदरहु अहवाल 3 प्रतीत पुढील कार्यवाहीस सादर करण्यात येत आहे.

सहपत्र:- वरीलप्रमाणे 3 प्रती

(डॉ. जितेंद्र रामगावकर)
**मुख्य वनसंरक्षक**
**चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर**

**प्रतिलीपी:-** उपवनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांना माहितीस अग्रेषित.

**प्रतिलीपी:-** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांना माहितीस अग्रेषित.